# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 25 March 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक २५ मार्च २०२५ दुपारी १.०० वा.**

****

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अत्यंत गंभीर झाली असून, सरकारच्या निष्क्रियतेमुळे गुन्हेगारीला चालना मिळत असल्याचा आरोप, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी आज विधानपरिषदेत केला. आज अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना त्यांनी, सरकारच्या कार्यपद्धतीचा निषेध केला. महिलांवरील वाढत्या अत्याचारांपासून सायबर गुन्ह्यांपर्यंत सरकार अपयशी ठरत असल्याचं ते म्हणाले. हास्य कलाकार कुणाल कामरा यांनी काहीही चुकीचं वक्तव्य केलेलं नाही, त्यांच्या स्टुडिओची तोडफोड करणार्यांकडून नुकसान भरपाई वसुल करायला पाहिजे, असं दानवे म्हणाले. राज्यात कायदा सुव्यवस्थेसंदर्भात निष्पक्षपातीपणे काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

****

दरम्यान, हास्य कलाकार कुणाल कामरा यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या वक्तव्याबद्दल माफी मागण्यास नकार दिला आहे. यासंदर्भात एक पत्रक जारी करुन त्यांनी, स्टुडिओची तोडफोड केल्याच्या घटनेचाही निषेध केला आहे.

****

अवैध हुक्का पार्लरविरोधात राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली असून, हुक्का पार्लर चालविण्याचा गुन्हा दखलपात्र करण्यात आला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधासनभेत सांगितलं. यापुढे दुसऱ्यांदा हुक्का पार्लर चालवत असल्याचं आढळून आल्यास, संबंधित उपहारगृहाचा परवाना सहा महिन्यासाठी रद्द करण्यात येईल, आणि तिसऱ्यांदा आढळून आल्यास परवाना कायमचा रद्द करूम अजामीनपात्र गुन्हा करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

किल्ले सिंहगडाच्या विकासासाठी पालकमंत्र्यांचा संमतीने संबंधित सर्व यंत्रणा आणि विभागांचा एकत्रित प्रस्ताव १५ दिवसात पाठवला जाईल, असं सांस्कृतिक मंत्री

आशिष शेलार यांनी आज विधानसभेत सांगितलं. पुरातत्व विभाग, पर्यटन विभाग, सार्वजनिक बांधकाम, जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका अशा सर्व यंत्रणांचा स्थानिक पातळीवरील एकत्रित विकास आराखडा तीन महिन्यात तयार करण्यात येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

बीड जिल्हा रुग्णालयात कोविड काळातल्या भ्रष्टाचार प्रकरणी तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सकांना तातडीने निलंबित करून पुढील तीन महिन्यांत चौकशी पूर्ण केली जाईल, तसेच दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, अशी घोषणा सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज विधानसभेत केली.

राज्यात नद्यांच्या पूरपातळीसाठी आखलेल्या निळ्या आणि लाल रेषांमुळे निर्माण झालेल्या प्रश्नांची तातडीने दखल घेत, यावर उपाययोजना करण्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल, अशी ग्वाही मंत्री उदय सामंत यांनी आज सभागृहात दिली. जलसंपदा विभागामार्फत नव्याने सर्वेक्षण आणि अभ्यास करून योग्य निर्णय घेतला जाईल, याशिवाय या हद्दीत जमिनीवर अवैध विकास परवानगी दिली असल्यास ती तत्काळ रद्द केली जाईल आणि संबंधितांवर कारवाई केली जाईल, असंही सामंत यांनी सांगितलं.

****

छत्तीसगढ मधल्या दंतेवाडा जिल्ह्यात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी मारले गेले. दंतेवाडा आणि बिजापूर जिल्ह्यांच्या सीमेवर असलेल्या जंगलात नक्षल विरोधी अभियान राबवत असताना आज सकाळच्या सुमारास ही चकमक झाली. चकमकीच्या ठिकाणाहून मोठ्या प्रमाणात शस्त्रसाठा जप्त करण्यात आला असून, या परिसरात सुरक्षा दलाकडून शोधमोहिम राबवण्यात येत असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

राज्याच्या विविध भागात उष्णतेची तीव्रता वाढत असून उष्माघाताच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक आरोग्य विभागानं नागरिकांना खबरदारीचा इशारा दिला आहे. आरोग्य विभागानं सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये उष्णतेशी संबंधित समस्यांवर उपचार करण्यासाठी विशेष कक्ष सुरू केले आहेत. सर्व जिल्हा आणि महापालिका स्तरांवरील साथरोग वैद्यकीय अधिकाऱ्यांना उष्माघात विषयक प्रशिक्षण देण्यात आलं आहे. राज्यात २१ मार्चपर्यंत उष्माघाताचे २१ रुग्ण आढळून आले आहेत.

****

नांदेड ग्रामीण परिसरात बोगस शिधापत्रिका तयार करुन देणाऱ्या ऋषिकेश पेदेवाड या सेतू चालकावर काल गुन्हा दाखल करण्यात आला. एका शिधापत्रिकाधारकाने धान्य मिळत नसल्याची तक्रार केल्यानंतर ही बाब उघडकीस आली. या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी पात्रता नसताना रेशन कार्ड काढण्याचा प्रयत्न करू नये, तसंच कोणाच्याही खोट्या दाव्याला बळी पडू नये, असं आवाहन तहसीलदार संजय वारकड यांनी केलं आहे.

****

महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरण – म्हाडाच्या छत्रपती संभाजीनगर मंडळातर्फे येत्या २८ मार्चला पहिल्या जनता दरबार दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. मराठवाड्यातल्या सर्व जिल्ह्यांमधल्या गाळेधारक, भूखंडधारक, सदनिकाधारकांनी त्यांच्या समस्या आणि अडीअडचणीबाबतचं म्हणणे मांडण्यासाठी आपलं लेखी निवेदन किंवा अर्ज मंडळाकडे २७ मार्च पर्यंत सादर करण्याचं आवाहन मंडळातर्फे करण्यात आलं आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० तारखेला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. या मालिकेचा हा १२०वा भाग असेल.

****